पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षेसाठी १२ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नैसर्गिक आपत्तीमुळे शिवाजी विद्यापीठाने स्थगित केलेल्या परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येत आहेत. शनिवारी १३ हजार ९४० विद्यार्थ्यांपैकी १२ हजार ४५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विद्यापीठ परीक्षा विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्रातील विद्यापीठ स्तरावरील सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. १७ व १८ मे रोजीच्या बीए., बीबीए, डीओटीच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या. विद्यापीठातर्फे स्थगित परीक्षा रविवारी नियमित वेळेत घेण्यात येणार आहेत. दरम्यान, हिवाळी सत्र परीक्षेअंतर्गत आजअखेर २२२ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

सकाळ

# 'माझं गाव कोरोनामुक्त गाव' अभियानाचे आयोजन

## राष्ट्रीय सेवा योजनेचा ऑनलाईन उपक्रम



कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ऑनलाईन 'माझं गाव कोरोनामुक्त गाव' अभियान राबविण्यात येणार आहे. महाविद्यालयांनी जवळची गावे दत्तक घेऊन त्यात ऑनलाईन प्रबोधन अभियान करायचे आहे. यासाठी वेगळा कक्ष स्थापन केला असून विद्यार्थी गावात कोरोनामुक्तीच्या बाबतीत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभये यांनी दिली.

याअंतर्गत लसीकरणाबाबतची जनजागृती केली जाणार आहे. मास्क, सॅनिटायझर, सोशल डिस्टन्सिंग या कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी नागरिकांना प्रवृत्त केले जाणार आहे. महाविद्यालयामध्ये प्राचार्य महोदयांच्या अध्यक्षतेखाली कोविड योद्धा समितीची स्थापना करून सदर समिती दत्तक गावातील ग्राम दक्षता समितीच्या सहकार्याने कोविड जनजागृती, वेळोवेळी शासनाकडून दिले जाणारे निर्देश, लसीकरण मोहीम याविषयी मोहीम राबवतील. यासाठी गावांमध्ये व्हॉट्सॲप ग्रुप बनवण्यात येणार आहेत. अभियान कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कोविड योद्धा समितीच्या मार्गदर्शनाखाली काम करणार आहे. समितीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, प्रा. जायभाये यांची समिती स्थापन केली आहे.